
स्टेजकोच मेरी फील्ड्सची कहाणी



स्टेजकोच मेरी फील्ड्सची

कहाणी



रॉबर्ट मिलर


मराठी : अश्विनी बर्वे




लेखकाची नोट

१८६० मध्ये रेलरोडचा विकास आणि टेलिग्राफचा शोध लागण्यापूर्वी, सेंट जोसेफ आणि मिसौरीच्या मध्ये "पोनी एक्सप्रेस" अशा नावाचा एक प्रयोग केला गेला होता. यात सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया जोरात धावणाऱ्या तट्टूच्या द्वारे डाक पाठवली जाई.मग काही वर्षांनंतर "पोनी एक्सप्रेस" बंद झाली आणि स्टेजकोच द्वारे डाक, एका शहरातून दुसऱ्या शहरात पाठवले जाई. त्यातला एक विशेष मार्ग—कॅस्केड, मोंटानाहून सेंट पीटर्स मिशनपर्यंत केवळ सतरा मैल दूरचा सगळ्यात प्रसिद्ध मार्ग होता. या मार्गावर टपाल घेवून जाणारी पहिली आफ्रिकी-अमेरिकी महिला मेरी फील्ड्स होती. जेव्हा तिला नोकरी मिळाली तेव्हा ती साठ वर्षांची होती.







त्या काळात जेव्हा पश्चिमेच्या भागात खूप जंगल होते, तेव्हा तिथं एक महिला राहत होती.जी तिथल्या जमिनी इतकीच मजबूत आणि दृढ इच्छाशक्ती असणारी होती. मेरी फील्ड्सचा जन्म १८३२च्या आसपास हिकमॅन काउंटी, टेनेसी मध्ये झाला होता. तिचा जन्म एक गुलाम म्हणून झाला होता. मेरीची इच्छा खूप बुलंद होत्या.



जेव्हा ती पाच वर्षांची होती, तोपर्यंत मेरी आपल्या पेक्षा दुप्पट वयाच्या मुलांना मागे टाकत होती. तिचे वडील तिला धन्य पेरायचे कसे हे शिकवण्याचा प्रयत्न करत. पण मेरी आपलं काम करत असतांना कधी कधी जिवंत बेडकाला सुद्धा मारून टाकत असे.


पण घोड्यांवर स्वार व्हायला तिला खूप आवडे.मेरी आणि तिच्या मालकाची मुलगी, डॉलीला डन नदीच्या किनारी शर्यत लावायला आवडत असे. खूप लवकरच दोन्ही मुली चांगल्या मैत्रिणी झाल्या.






शेतावर काळ लवकर सरला. लवकरच मालकाची मुलगी निघून गेली आणि मेरी एक मोठी, मजबूत महिला झाली. ती लिहायला-वाचायला शिकली. आणि जेव्हा ती मोठी झाली, तेव्हा मेरीने सिगारेट प्यायला सुरुवात केली..


१८६५चे युद्ध समाप्त झाल्यावर मेरी फिल्ड्स एक स्वतंत्र महिला झाली. पण मेरीने या परिवारासाठी आपल्या जीवनभर काम केले. ते तिला परिवारातली एक मानत. आता ते मेरीला क्माची मजुरी देवून खुश झाले होते.



म्हणून मेरीने तिथेच राहण्याचे ठरवले.पण ती अस्वस्थ होती. ती दिवसेन दिवस वाट बघत होती आणि काहीतरी नवीन घडण्याची आशा करत होती.

मग एक दिवस मेरीला एक पत्र मिळाले. तिची लहानपणाची मैत्रीण डॉली, आता ती एक नन झाली होती. डॉलीला वाटत होते की मेरीने तिच्या बरोबर कॅस्केड, मोंटानाच्या जवळ सेंट पीटर्स मिशन मध्ये येवून काम करावे. मग मेरीने सगळं काही सोडून आपल्या लहानपणच्या मैत्रिणीशी जोडून घ्यायला तयार झाली.






मेरी आणि डॉलीला शेताच्या जवळच्या जंगलात धावून बराच काळ लोटला होता. त्या आता मुली नव्हत्या तर महिला झाल्या होत्या. मेरी उंच होती. तिने पश्चिमी कपडे घातलेले होते आणि तिच्या कमरेला बंदूक होती. डॉलीचे नाव आता सिस्टर एमॅड्यूस झालं होतं. तिने मेरीचे दोन्ही हात पसरून स्वागत केलं.

सिस्टर एमॅड्यूसने मेरीला मिशनच्या जवळच्या इमारती दाखवल्या. ज्या जुन्या होत्या आणि ज्यांना दुरुस्तीची गरज होती. मेरी लवकरच तिथं स्थिर झाली.लवकरच ती काम करू लागली. मेरीने पुरुषांना कामात मदत केली. तिने जड दगडांना उचललं आणि देखभाल करण्यास मदत केली.





लवकरच, मेरी मजुरांची बॉस झाली. पण एका माणसाला एक काळ्या महिलेने आज्ञा केलेली आवडत नव्हती..

एक दिवस मेरी पुरुषांना कामाचे आदेश देत होती.पण एका नवीन मजूराने लक्ष दिले नाही.


"ठीक आहे मिस्टर, पुढे व्हा आणि कामाला लागा," मेरी त्याला म्हणाली.

इतर पुरुष हसले. पण या नव्या मजुराने तसं केलं नाही.

“एखादा गुलाम कधीपासून गोऱ्या पुरुषाचा मालक झाला?” तो माणूस रागात म्हणाला.


“इथं कोणी गुलाम नाहीं, मिस्टर. चल लवकर कामाला लाग.”

पुढे जे झालं त्याचा सगळ्यांना धक्का बसला. नवा मजूर मेरीजवळ गेला. त्याने मागे वळून मेरीवर वार केला आणि तिला खाली पाडलं.



जमीनीवर पडता पडता मेरीने आपल्या पायावर उडी मारली आणि उठून उभी राहिली. ती शेतावर राहिली-वाढली होती. तिला बंदुक चांगली चालवता येत होती.

"मिस्टर आपली बंदूक घेवून या, आणि मला रस्त्यावर येवून भेट," मेरीने त्या माणसाला आव्हान दिलं. डोळ्याचं पातं लवत नाही तोच तो माणूस आपली सिक्स-शूटर बंदूक घेवून आला.




पण मेरी त्याच्यापेक्षा चपळ होती.तिने तीन गोळ्या चालवल्या, आणि त्या माणसाला हरवलं.


मग मेरी गोठ्यात गेली आणि कोंबड्यांना दाणे खायला घालू लागली.

“मी एका निष्पक्ष स्पर्धेत त्याची पिटाई केली,” मेरीने बाकी मजुरांना सांगितलं. “कोणीही पुरुष मला शिवू शकत नाही.”


बंदूकच्या लढाईची कहाणी लवकरच सगळ्या परिसरात पसरली.ती बातमी चर्चा बिशप पर्यंत पोहचली. “त्या काळ्या स्त्रीचा खूप उपद्रव होत आहे,” बिशपने सिस्टर एमॅड्यूसला म्हटले. “हे बघा, मेरीला मिशन सोडायलाच लागेल.”


सिस्टर एमॅड्यूस माहित होतं की ती बिशप यांचे मन बदलू शकत नव्हती. पणतिला आपल्या लहानपणच्या मैत्रिणीला गमवायचं नव्हतं. त्या रात्री तिने विचार केला आणि प्रार्थना केली की मेरीला मिशनमध्ये कसं थांबवावं.






दुसऱ्या दिवशी, सिस्टर एमॅड्यूसला आठवलं की अमेरिकी टपाल सेवा, कॅस्केड, मोंटाना आणि सेंट पीटर्स मिशनच्या मध्ये एक नवा टपाल मार्ग उघडत आहे.नवीन टपाल मार्ग अवघड होता. तो वाकडे-तिकड्या रस्त्याने डोंगरातून जात होता आणि तिथं रस्त्यात अनेक बदमाश चोर होते. फक्त सगळ्यात मजबूत आणि सगळ्यात अनुभवी घोडेस्वारच त्या नोकरी बद्दल विचार करू शकत होता.







ज्या दिवशी मेरी शहरात घोड्यावर स्वार होवून पोहचली, तेव्हा कमीत-कमी चाळीस घोडेस्वार पोस्ट डेपोत तिच्या आधी पोहचले होते. मेरी आपल्या भुऱ्या रंगाच्या घोड्यावरून उडी मारून उतरली. तिच्या एका हातात रायफल आणि दातांच्या मध्ये एक सिगारेट होती.मेरी डेपोच्या पायऱ्या चढून वर गेली.

“मी इथं ड्रायव्हरच्या नोकरी साठी आले आहे,” मेरी म्हणाली, “इथला मालक कोण आहे?”


डेपोतून एक मोठा माणूस बाहेर आला. “मीच नवीन भरतीचा इन्चार्ज आहे,” तो म्हणाला, “तुम्हांला काय पाहिजे?”

मेरी सरळ उठून उभी राहिली, “मला ड्रायव्हर व्हायचे आहे. मी भरती होण्यासाठी काय करू?”


डेपो मॅनेजरने मेरीकडे लक्षपूर्वक पाहिलं, "मॅडम, तुम्ही घोड्स्वारी करतात का?” त्याने विचारलं.

“मी सहा घोड्यांची टीम चालवू शकते, कोणाही पेक्षा चांगली!” मेरी म्हणाली.


“जर हे खरं असेल, तर तुम्हांला काम मिळून जाईल. पण आधी तुम्हांला त्या घोड्यांना जुंपायला हवं.”, मॅनेजरने घोड्शाळेकडे इशारा केला जिथं घोडे बांधले होते.




ठीक आहे. तुम्ही “रेडी” म्हणायच्या आत मेरीने त्या घोड्यांना एकत्र बांधले सुद्धा होते. तिच्या एका फटक्याने, ते घोडे हवेत उडायला लागले होते. “पुढे चला!” मेरी ओरडली.



जोपर्यंत मेरी घोड्यांना थांबवत नाही, तोपर्यंत डेपो मॅनेजरने आपल्या मनात पक्कं केलं होतं. त्याने मेरीला जागेवरच काम दिलं. आणि अशा पद्धतीने मेरी फिल्ड्स अमेरिकी टपाल घेवून जाणारी पहिली काळी महिला ड्रायव्हर झाली.



टपाल वाटण्याचे काम सोप्पे नव्हते. मेरींची एकापेक्षा अधिक वेळा डाकुंशी गाठ पडली.पण मेरीला वेळेवर टपाल पोहचवण्यापासून कोणी रोखू शकलं नाही. जर एखादा डाकू खूप जवळ आला, तर मेरी एका हाताने लगाम धरे आणी दुसऱ्या हातात सिक्स-शूटर बंदुक घेवून पूर्ण ताकदीनिशी गोळ्या झाडत ती पुढे जाई. ती लवकरच "स्टेजकोच मेरी फील्ड्स" नावाने ओळखू जायला लागली.



एकदा, मोंटानाच्या खराब हिवाळ्यात खूप बर्फ पडला आणि तिचे घोडे पुढे जाऊ शकले नाही. मग मेरीने आपल्या पाठीवर टपालचे गाठोडे घेतले. तिने आपल्या हातात रायफल घेतली, आणि डेपो पर्यंत दहा मैल ती चालत गेली, यावर तुम्ही विश्वास ठेवाल का? पण तिने नेहमीच टपाल वेळेवर पोहचवले.




एकदा, मेरी नेहमीच्या रस्त्याने जात मिशनकडे परत जात होती. तिने रस्त्यावरील सगळ्या शॉर्टकटचा उपयोग केला. सिस्टर एमॅड्यूस आजारी होती आणि त्यांना विशेष देखभालीची गरज होती. मिशनमध्ये खाद्य पदार्थांची सुद्धा कमतरता होती. म्हणून मेरीने आपल्या गाडीत धान्य भरून घेतलं.

जवळजवळ रात्र झाली होती. एका डोंगरावरून खाली येतांना मेरीला कोरडा नाला दिसला नाही, जशी तिची गाडीची टक्कर झाली,तसा गरजण्याचा आवाज आला तिचं धान्य इकडेतिकडे पसरलं.

मेरीने लगेच आपल्या घोड्यांना शांत केलं. तिला माहित होतं की लवकरच अंधार होईल.भराभर काम करत, तिने सगळ्या गोण्या गाडीत परत ठेवल्या.पण तोपर्यंत रात्र झाली होती. लांडगे आणि रानटी कुत्री आसपास गर्जू आणि गुरगुरू लागले होते.

मेरी रात्रभर आपली रायफल घेवून गाडीच्या बाहेर बसून राहिली. “जवळ तर या बदमाशांनो!” ती ओरडली.जेव्हा लांडगे खूप जवळ येत तेव्हा मेरी अंधारात गोळ्या झाडत त्यांना घाबरवत आणि पळवून लावत असे..







जेव्हा दिवस उजाडला तेव्हा मेरी मग मिशनकडे गेली. मेरीला बघताच सिस्टर एमॅड्यूसला आधीपेक्षा बरं वाटू लागलं. “मला खूप आनंद झाला की तू सुरक्षित परत आली,”ती हळू आवाजात म्हणाली.

मेरी म्हणाली, “आता तुम्ही कोणत्याही गोष्टीची काळजी करू नका,मी आता इथं आले आहे.”

काहीदिवसांतच मेरीच्या सेवेमुळे सिस्टर एमॅड्यूसची तब्येत सुधारली.





आठ वर्षे टपाल वाटप केल्यानंतर, मेरी थकली. सिस्टर एमॅड्यूस च्या मदतीने मेरीने कास्केड, मोंटाना मध्ये कपडे धुण्याचा व्यवसाय सुरु केला.


एका दुपारी, मेरीने एक काऊबॉय बघितला.ज्याच्याकडे तिचे पैसे बाकी होते, "मिस्टर!" मेरी ओरडली. “तू माझ्याकडे कपडे धुवायला दिले होते,आता त्याचे पैसे दे.”

काऊबॉयने तिच्याकडे बघितले आणि हसला. “मी तो नाही ज्याला तुम्ही शोधत आहात,” तो म्हणाला आणि मग परत जाऊ लागला..



मेरीने त्याला पकडून हवेत फिरवलं. “तुला पैसे द्यावेच लागतील,” ती म्हणाली. तिच्या हातात तिची सिक्स शुटर बंदूक होती.

काऊबॉय एवढा घाबरला की त्याने लगेच घाईने आपल्या खिशातून पैसे काढून मेरीच्या हातात ठेवले. मेरीने पैसे मोजले, मग तिने आपले पैसे घेवून, बाकीचे पैसे काऊबॉयच्या खिशात परत ठेवले. आणि तिथून निघून गेली.



आपल्या ऐंशीव्या वाढदिवसाच्या दिवशी, मेरी फील्ड्सचे निधन झाले. तिला एका पहाडाच्या पायथ्याशी दफन केलं. तो रस्ता जुन्या सेंट पीटर मिशनकडे जात होता. ज्या रस्त्यावरून मेरीने अनेक वर्षे प्रवास केला होता - आणि त्या रस्त्यानेच ती मिशनसाठी सामान आणत असत. त्या रस्त्यावर तिचे खूप प्रेम होते.

कधी–कधी रात्री जेव्हा हवा पहाडाला टक्कर देत असेल, आणि तेव्हा जर आपल्याला घोड्यांच्या टापांचा आवाज आणि कोणीतरी जोरात “हट!” म्हणतांना ऐकू आलं तर नक्कीच ती - स्टेजकोच मेरी फील्ड्सच असेल.

समाप्त